# दुष्काळग्रस्तांच्या जाहीर मागण्या

## शरद नूलकर

महाराष्ट्रातील भीषण दुष्काळाची व्याप्ती व तीव्रता लक्षात घेऊन केवळ सरकारी यंत्रणेद्वारा दुष्काळ निवारणाचे कार्य योग्य रीतीने होऊ शकणार नाही व त्यासाठी स्वयंस्फूर्त व्यक्ती आणि संस्था यांना कार्यप्रवण करण्याची आवश्यकता आहे, याची जाणीव होऊन सर्वपक्षीय मध्यवर्ती दुष्काळ निवारण व निर्मूलन समितीची स्थापना झाली आहे. समितीने आतापर्यंत जिल्ह्या-जिल्ह्यांतून निरीक्षक नेमून दुष्काळाबाबतची प्रत्यक्ष माहिती घेतली, व दुष्काळी कामांबाबत येणाऱ्या अडचणींचा विचार करून त्या सोडवण्यासाठी शासनाकडे निवेदने दिली. दुष्काळी परिस्थितीचे वेळोवेळी पुन्हा एकदा परीक्षण करून आणि नव्याने येणाऱ्या अडचणींचा विचार करून, यापुढे कामाची दिशा कशा स्वरूपाची राहावी हे निश्चित करण्यासाठी आणि सरकारने या कामी कोणते धोरण स्वीकारावे याचे दिग्दर्शन करण्यासाठी, दुष्काळी कामांवर प्रत्यक्ष काम करणाऱ्या मजुरांची व त्यांच्या प्रतिनिधींची परिषद दि. ४ मार्च रोजी पुणे येथे शिवाजी मंदिरात शिवाजी मंडळाच्या वतीने भरली होती.

या परिषदेस बहुतेक सर्व जिल्ह्यांतील प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच विविध पक्षांचे प्रमुख नेतेही उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रा. वि. म. दांडेकर होते.

### झुंजण्याची जिद्द

दुष्काळी कामावर होणाऱ्या गैर प्रकाराबद्दल अनेक वेळा वर्तमानपत्रांतून माहिती येत असली तरी त्याबाबतचे अनुभवाचे बोल ऐकताना मन अस्वस्थ होत होते. महिन्यातून जमतेम १२ ते १५ दिवस काम, रोजी पुरुषास २॥ व स्त्रीस २ रु. मजुरी ( तीही काही ठिकाणी कमी,—व १५ दिवस ते एक महिन्यानंतर मिळणार ). मजुरी मिळाली तरी रेशन दुकानात धान्य नाही म्हणून उपासमार, आणि मिळालेले धान्यही निकृष्ट दर्जाचे, अशा प्रकारे हजारो कुटुंबे आपले दिवस कसे कंठीत असतील हे कल्पनाशक्तीला कितीही ताण दिला तरी कसे जाणवावे ? अशाही परिस्थितीत मजूर हताश झालेले नाहीत; तर झुंजत राहून काम करून योग्य दाम मिळवण्याचा त्यांचा निर्धार आहे. असे असले तरी दुष्काळग्रस्तांच्या सहनशीलतेचा अंत न पाहता सरकारने त्यांच्या अडचणींचे त्वरित निवारण करणे आवश्यक आहे.

### अडचणींचा पाढा

दुष्काळग्रस्त मजुरांच्या प्रमुख अडचणी म्हणजे सलग काम न मिळणे, पगार वेळेवर न मिळणे, आणि धान्य अपुरे मिळणे, या होत. याशिवाय कामासाठी हत्यारे न पुरवणे, आणि पुरवलेली हत्यारे हलक्या दर्जाची असल्याने ती निरुपयोगी ठरणे याही अडचणी आहेत. 'मागेल त्यास काम' या सरकारी घोषणेप्रमाणे सर्वांना काम मिळू शकत नाही; तसेच, काम आहे पण हत्यारे नाहीत यामुळेही अनेकांना रोजगार मिळत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे अत्यंत अल्प रोजगारावर कुटुंबाचे पालनपोषण करण्याची कठीण जबाबदारी लाखो कुटुंबकर्त्यांवर येऊन पडली आहे. यासाठी परिषदेने सर्वांना सतत सलग काम देण्याविषयी शासनाला आग्रह केला असून, यापुढील मजुरांचे श्रम उत्पादक कामांवर खऱ्या अर्थी कारणी लावावेत असे सुचवले आहे.

### खडी फोडणारांची दुर्दशा

खडी केंद्रावरचे अनुभव विशेष उल्लेखनीय होते. मुख्य म्हणजे हत्यारांचा अभाव ! घण, पहारी, हातोडे इत्यादी साहित्य मजुरांना न पुरवल्याने अनेकांना ते विकत वा भाड्याने आणावे लागते; व आपल्या तुटपुंज्या मजुरीचा काही हिस्सा या भाड्यापोटी द्यावा लागतो. तसेच हत्यारे शेवटून घेण्यासाठीही त्यांना पदरमोड करावी लागते. शिवाय दुखापतीचे प्रमाण खडी-केंद्रांवर मोठे आहे. डोळा जाणे, हाताची बोटे निकामी होणे इत्यादी अनेक प्रकार आहेत. पण त्यासाठी वैद्यकीय म[...] उपलब्ध होऊ शकत नाही. यासा[...] सर्वांना हत्यारे पुरवण्याबाबत [...] जोरदार मागणी केली आहे.

### उत्पादक कार्यक्रमांवर भर [...]

एकंदरीत रस्ते अगर खडी फोड[...] पाझर तलाव आणि सामुदायिक वि[...] यापुढे भर देण्यात यावा, अशी [...] मागणी दिसली. सामुदायिक वि[...] बाबतीत सर्वच ठिकाणचे अनुभव [...] कारक नाहीत. काही ठिकाणी [...] जमिनदारांच्याच जमिनीत [...] घेण्यात आल्याने छोट्या शेतकऱ्यां[...] पुरेपूर फायदा मिळालेला नाही. [...] दलितांच्यासाठी अशा विहिरी [...] झालेली नाही.

### अन्नाबाबत आबाळ

रेशन अत्यंत अपुरे असल्याची त[...] केली. आठवड्यास ४ घटकांच्या [...] १७॥ किलो धान्याची जरुरी अस[...] ५ ते ७ किलोच धान्य मिळते. [...] दुष्काळपीडितांच्या उपासमारीची [...] करता येईल ! त्यामुळे काळ्या [...] जादा दाम देऊन धान्य खरेदी कर[...] यामुळे उत्पन्न-खर्चाचा ताळमेळ [...] नाही. कर्जबाजारीपणा वाढू लाग[...] आणि केवळ एक वेळच्या अन्नाला [...] पैसा खर्च होत असलेल्यांना कपड[...] शिक्षण इत्यादींसाठी पैसा खर्च कर[...] होऊन बसले आहे.

### मजुरी धान्याशी बांधून [...]

यासाठी परिषदेने दिवसाकाठी [...] काम, सहा दिवस काम, आणि [...] सुट्टीचा; आणि सात दिवसांना [...] १७॥ किलो धान्य व इतर खर्चासाठी [...] धान्य ( म्हणजे १७॥ किलो ) [...] चार घटक असलेल्या प्रत्येक [...]

धान्याच्या किंमतीइतकी मजुरी द्यावी, अशी आग्रहाने मागणी केली व मजुरीने दर धान्याच्या चालू भावाच्या संदर्भात मिळतेजुळते ठेवले जावेत अशीही जोरदार मागणी केली आहे.

### श्रमिकांचा निर्धार

'मागेल त्याला काम' या सरकारी घोषणेची अंमलबजावणी करण्यास सरकार असमर्थ ठरल्याबद्दल परिषदेने खेद व्यक्त केला आहे. त्याबरोबरच 'मागेल त्याला काम' या घोषणे-प्रमाणे सरकारकडून काम मिळवून घेण्यासाठी सर्व श्रमिकांनी संघटितरीत्या एकत्र यावे, असे आवाहनही परिषदेने केले आहे. ठिक-ठिकाणचे श्रमिक पुढाऱ्यांच्या मार्गदर्शनाची वाट न पाहता स्वतःच्या हिंमतीवर एकत्र येऊन तहसीलदार, गट विकास अधिकारी, इंजिनीयर्स इत्यादींना 'घेराव' घालून आपल्या मागण्या मान्य करून घेत असल्याचे अनेकांच्या भाषणांवरून दिसून येत होते. 'उपाशी मरण्यापेक्षा बंदुकीच्या गोळ्या खाऊन मरू' असा निर्धारही व्यक्त करण्यात आला. सरकारने वेळीच या परिस्थितीची गंभीरपणे दखल घेऊन तातडीने आवश्यक ती कारवाई करण्याचा शहाणपणा दाखवला नाही, तर परिस्थिती स्फोटक बनेल. ▣ ▣

# दुष्काळ निवारण मार्गदर्शिका

दुष्काळनिवारणार्थ आपणही काही तरी करावे असे प्रत्येकाला वाटते; प्रत्येकाला काही तरी करता येण्यासारखे आहेही पण त्याबाबत योग्य मार्गदर्शन न झाल्याने सदिच्छा समूर्त आणि साकार होऊ शकत नाही. त्याचबरोबर अनेक वेळा असेही घडते की, एकाच कामात अनेक संस्था लागतात आणि उपलब्ध साधनांचा जेवढा कमाल उपयोग व्हायला हवा तेवढाही होऊ शकत नाही. हे टाळण्याचा काही तरी प्रयत्न करावा म्हणून राष्ट्र सेवा दल, युवक क्रांती दल, महिला सभा, आणि समाजवादी पक्ष यांनी परस्परांशी सहकार्य करून कार्य हाती घ्यावी असे ठरले आहे. दुष्काळ निवार-णाच्या इतर संस्था-संघटनांशीही त्यांचे सहकार्य राहील.

प्रत्यक्ष दुष्काळी भागात जाऊ शकणार नाहीत त्यांनीही आपापल्या ठिकाणी काम करावे अशी अपेक्षा राखलेली आहे. वीज-पाणी यांचा काटकसरीने आणि शिस्तबद्ध रीतीने वापर केला जावा, यासाठी कार्य मिळवावे लागेल. शहरातील त्यातल्या त्यात बऱ्या मंडळींकडून कपडे, औषधे, निधी जमवून पाठवताना काटकसर करण्याचीही जरुरी आहे हे विसरले जाऊ नये. पुणे-मुंबई शहरांत दुष्काळाचे दर्शन घडत नाही, व त्यामुळे शहरी जीवांना दुष्काळग्रस्तांच्या हालअपेष्टांची पुरेशी कल्पनाही येत नाही. छायाचित्रे शहरी लोकांना दाखवली तर त्याचा परिणाम होण्यासारखा आहे. दुष्काळग्रस्त भागात जाऊन कार्य करू इच्छिणारे अनेक आहेत. आपल्या लगतच्या भागात, पण संघटितपणे त्यांनी काम करावे अशी कल्पना आहे. रोजगार, मजुरी, धान्यपुरवठा या दुष्काळग्रस्त लोकांच्या दैनंदिन समस्या आहेत. ह्या बाबतीत दाद मिळवायची तर कार्यकर्ते उपयोगी पडू शकतात, पण त्यांनाही माहिती असली पाहिजे. या दृष्टीने श्री पन्नालाल सुराणा यांनी दुष्काळ निवारण मार्गदर्शिका तयार केली असून 'जनवाणी'चा अंक म्हणून ती प्रसिद्ध केली आहे. दुष्काळ निवारणाचे ज्या कोणाला काम करायचे असेल त्याने पन्नास पैशात उपलब्ध असलेली ही पुस्तिका जवळ बाळगली पाहिजे, इतकी ती नेटकी आणि उपयुक्त आहे. दुष्काळ ही जशी एक आपत्ती आहे तशी ती संधीही आहे. दुष्काळग्रस्तांच्या शरीर स्वास्थ्याची काळजी घेतानाच त्यांच्यात सुधार वृत्ती व नव्या सामाजिक जाणीवा जागवता आल्या, कार्यकर्त्यांनी तशी कामाची आखणी केली तर दुष्काळही आपल्यावरील अन्यायाचे सुसंघटित प्रयत्नांनी परि-मार्जन करता येते, असा आत्मविश्वास दुष्काळग्रस्तांत निर्माण झाला तर दुष्काळानंतर गावांचा चेहरा-मोहरा बदललेला दिसल्यावाचून राहणार नाही.

श्री पन्नालाल सुराणा सध्या मुख्यतः दुष्काळी कामाशीच निगडित आहेत. महाराष्ट्राचा प्रायः सर्व दुष्काळी भाग त्यांनी पायाखाली घातला आहे. दुष्काळग्रस्तांच्या समस्या, शासनाची योजना, आणि अंमलबजावणीबाबतची स्थिती याची त्यांना बारकाईने माहिती आहे. त्यामुळे त्यांनी चाळीस पानांत आणि अकरा प्रकरणांत अतिशय सुबोध पद्धतीने दुष्काळाचा मुकाबला करताना कोणत्या गोष्टीचे अवधान ठेवणे आवश्यक आहे ते समजावले आहे. यंत्रणेची माहिती दिली असून पैशांच्या उपलब्धतेविषयीचे धोरण स्पष्ट केले आहे. अधिकाऱ्यांच्या कार्यालयांची जंत्री दिलेली असून दुष्काळ निवारणातील त्यांची जबाबदारी कोणती तेही स्पष्टपणे सांगितले आहे. रोजगार व कामाच्या ठिकाणच्या सोयींची माहिती फार महत्त्वाची आहे. अन्नधान्याच्या पुरवठ्याबाबत सरकारचे जाहीर धोरण एक, आणि वस्तुस्थिती दुसरी दिसते. धान्य पुरवठ्याबाबतच्या तक्रारी सार्वत्रिक आहेत. मजुरी नियमांचे काटेकोर पालन करून देण्यात येते, पण धान्याचा पुरवठा मात्र नियमांप्रमाणे होत नाही; त्यामुळे दुष्काळग्रस्त आणखीच नागवला जातो. दुष्काळग्रस्त संघटित झाले तरच याबाबतच्या अन्यायाचा जाच कमी होईल.

दुष्काळ पाऊस पडल्यानंतर सैल होईल आणि पुन्हा लोकजीवन पूर्व-पदावर येऊ लागेल. त्या दृष्टीनेही स्पष्ट आखणी करण्यात आली आहे. दुष्काळी कामाला लोक सरावल्यामुळे शेती उत्पादन खंडित होता कामा नये ही दृष्टी ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उत्पादनाला उपकारक अशी जी कामे असतील ती अपुरी राहूनही चालणार नाही. यापुढील दोन तीन महिने दुष्काळाचे चटके अधिकच बसणार आहेत; आणि दुष्काळ निवारण कार्यासाठी तरुणांचे अधिक बळही उपलब्ध होणार आहे. त्या सर्वांना ही मार्गदर्शिका अत्यंत उपयुक्त आहे. ज्याला ज्याला म्हणून दुष्काळाबद्दल काही कर्तव्य आहे त्या त्या प्रत्येकाने ही पुस्तिका वाचावी. दुष्काळनिवारणाच्या कामी कोणत्याही प्रकारची माहिती हवी असेल, किंवा मुंबई येथे सरकारी पातळीवर काही अडीअडचणी सोडवायच्या असतील तर : श्री सुधाकर प्रभुदेसाई, 'जनता' साप्ताहिक, ६ नॅशनल हाउस, टुलो रोड, अपोलो बंदर, मुंबई १, यांच्याशी संपर्क साधावा. ▣ ▣